# ओळखा पाहू मी कोण? ५



बालशास्त्रज्ञ डेक्स्टर! ९



वैभवशाली वारसा १२



NIE Website


सकाळ

अंकासाठी संपर्क 98815 98815

पुणे, शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ ■ पाने १२ किंमत ₹ ६

NIE NEWSPAPER IN EDUCATION




# फळांच्या राजाचा थाट!

आंबा हे फळ पृथ्वीवर खूप खूप वर्षांपासून- म्हणजे अगदी हजारो वर्षांपासून आहे. हा एक उष्णकटिबंधीय वृक्ष आहे. आंब्याचे शास्त्रीय नाव 'मँगिफेरा इंडिका'. भारतात आंब्याच्या १ हजारपेक्षा अधिक जाती आढळतात. आता तुमच्या डोळ्यांसमोर कदाचित असे चित्र आले असेल, की आपण फळबाजारात गेलोय आणि तिथे ओळीने १ हजार फळविक्रेते एकेका प्रजातीचे आंबे विकायला बसले आहेत!... पण आंब्याच्या सगळ्याच प्रजातींची लागवड केली जात नाही. त्याच्या खूप प्रजाती जंगलातही आढळतात. आपल्याकडे विविध राज्यांत विविध प्रजातींचे आंबे प्रसिद्ध आहेत. पण आंब्याची एक प्रजाती मात्र इतर सगळ्यांवर निर्विवाद वर्चस्व गाजवून आहे. तो आहे कोकणातला हापूस आंबा! आज या सुगंधी आणि चवदार आंब्याविषयी थोडेसे जाणून घेऊ.



## 'हापूस'चा इतिहास

- दोस्तांनो, तुम्ही 'आंब्याचे कलम करणे' हा शब्दप्रयोग ऐकला आहे का? अगदी ढोबळपणे समजून घेऊया. एका आंब्याच्या झाडाची फांदी दुसऱ्या आंब्याच्या खोडाला जोडली जाते. अशा पद्धतीने आंब्याचे नवीन झाड तयार केले जाते. या नवीन झाडात दोन्ही आंब्याच्या झाडांचे चांगले गुणधर्म असतात.
- पोर्तुगीज लोकांनी सोळाव्या शतकात गोव्यामध्ये अशा प्रकारे आंब्याची कलमे केली. त्यातून आंब्याची एक नवीन प्रजाती विकसित करण्यात आली. अल्फान्सो डी अल्बुकर्क या पोर्तुगीज प्रमुखाच्या नावावरून या आंब्याला 'अल्फान्सो मँगो' (Alphonso) हे नाव देण्यात आले.
- या आंब्याला कोकणातील वातावरण छान मानवले आणि तो कोकणचा होऊन गेला.
- भारतीय लोक 'अल्फान्सो'/'अल्फोन्सो' हा शब्द 'अपूस' असा उच्चारत. कालांतराने त्याचाही अपभ्रंश होऊन 'हापूस' हा शब्द वापरला जाऊ लागला. आहे ना मजा!



## भौगोलिक विशेष!

- हापूस आंब्याला 'जिओग्राफिक इंडिकेशन' म्हणजे 'जीआय टॅग' मिळाला आहे. विशिष्ट भौगोलिक प्रदेशात होणाऱ्या आणि विशिष्ट गुणधर्म असलेल्या उत्पादनांना 'जीआय टॅग' दिला जातो.
- महाराष्ट्रातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांमध्ये होणाऱ्या हापूस आंब्याची या टॅगखाली नोंदणी झालीय.
- असा जीआय टॅग मिळणे मानाचे समजतात. याचा अर्थ या भौगोलिक प्रदेशातला हापूस आंबा चवीला उत्तमच असणार!
- दार्जिलिंगचा चहा, महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी या पिकांना हा जीआय टॅग मिळाला आहेत. तसाच तिरुपतीचे लाडू, बनारसची साडी यांनाही जीआय टॅग आहे.

## मधुर वासाचे रसदार फळ

- रत्नागिरी आणि देवगडचा हापूस आंबा खूपच प्रसिद्ध आहे. आपल्याकडे कर्नाटकमधूनही हापूस आंबा विकायला येतो.
- चांगला हापूस आंबा छान वासाचा असतो. तुम्ही फळवाल्याकडे आंबे आणायला गेलाय का कधी? अनेक जण आंबे खरेदी करताना आंब्याच्या देठाच्या भागाचा वास घेतात. तयार झालेल्या दर्जेदार आंब्याचा वास गोड-मधूर असतो.
- हापूस आंबा रसदार असतो आणि त्याचा गरही 'क्रीमी' असतो. त्यामुळेच हापूसचा 'आमरस' मस्त लागतो.
- महाराष्ट्रात हापूसच्या व्यतिरिक्तही विविध प्रजातींच्या आंब्यांचे उत्पादन होते. उदा. कोकणात रायवळ, राजापुरी, तोतापुरी आंबेही पिकवतात, तसेच विदर्भ आणि मराठवाड्यात केशर आंब्याचे उत्पादन घेतात.

# सकाळ

रात्रीची वेळ गेली
आता उजाडली सकाळ
मन असते रात्रीस खिन्न
सकाळी होते मन प्रसन्न

सकाळी उठल्यावर
लोक करतात स्नान
स्नान झाल्यावर असतो
छान नाश्त्याचा मान

जर केले नाही
सकाळी उठल्यावर स्नान
तर माझी माय मात्र
धरते माझे कान

सकाळी वाहतो मस्त
शीतल, थंडगार वारा
त्यात आसमंत
बहरून येतो सारा

सकाळी बाप शेतात जाय
गुरं-ढोरांचं सारं काही पाहते माय
सकाळी बाप शेतात जाय
जेवणाच्या वेळी वाट पाहते माय

अशी असते ही लाजाळू सकाळ
बदलून टाकते सगळा भवताल

**- गणेश सुपे,** नववी,
शासकीय माध्यमिक आश्रमशाळा राजपूर,
ता. आंबेगाव, पुणे



# आमची सहल



एकदा आमच्या ताई (बाई) परीक्षेचे वेळापत्रक देत होत्या आणि वेळापत्रक लिहून झाल्यावर त्या म्हणाल्या, "परीक्षेनंतर तुमची सहल जाणार आहे." हे ऐकून सगळ्या मुलांमध्ये कुजबुज सुरू झाली. आमच्या ग्रूपमध्येही कुजबुज सुरू झाली. माझ्या ग्रूपमध्ये गार्गी, स्वरा, मृण्मयी, प्रांजल या मैत्रिणी आहेत. नंतर ट्रीपची तारीख कळली. ती १३ जानेवारी अशी होती. मग आम्ही सर्व काही प्लॅनिंग केलं. माझी तयारीही सुरू झाली. मी बॅग भरली. सोबत उलटीची गोळी आणली, थोडे पैसे सोबत घेतले. ट्रीपचा दिवस उजाडला. मी सकाळी सगळं आवरून शाळेत जायला निघाले.

मी शाळेत पोहचले, तर सगळ्या मैत्रिणी आल्या होत्या. आमची 'पांढरी परी' जरा वेळाने आली. आमच्या बसचा रंग पांढरा होता. त्यामुळे आम्ही असं नाव ठेवलं. काही पालकांनी फोटो काढले. मग बस निघाली. आम्ही खाऊ खात खिडकीतून बाहेर बघत होतो. कोणी गप्पा मारत होतं. काही जण सामान वर ठेवत होते. थोड्या वेळाने सहलीतीलं पहिलं ठिकाण आलं, ते म्हणजे पार्श्व प्रज्ञालय हे जैन मंदिर. आम्ही चपला काढून मंदिरात गेलो. तिथलं नक्षीदार बांधकाम पाहून आम्ही भारावून गेलो. तिथे खूप प्रसन्न वातावरण होते. मग आम्ही तिथल्या मोकळ्या जागेत बसून नाश्ता केला. आम्ही केलेला कचरा उचलून मग आम्ही बसच्या दिशेने निघालो. नंतर बसमध्ये गाण्यांच्या भेंड्या आणि इतर विविध खेळ सुरू झाले. थोड्याच वेळात आम्ही बिस्किट फॅक्टरीला पोहोचलो. तिथे बिस्किटांचा खमंग वास येत होता. बाहेर पडताना त्यांनी आम्हाला गरम-गरम बिस्किटे दिली. पुढचं ठिकाण पॉलिहाउस हे होतं. आम्ही शेताबरोबरच कोंबड्या, गाई, गुरे बघितली. तिथे गुलाबाची फुलेही होती. मग आले गाथा मंदिर. तिथल्या एका दादांनी आम्हाला संत तुकाराम महाराजांची माहिती दिली.

बसमध्ये बसून आम्ही गप्पा मारल्या. काही जणांना खूप झोप येत होती, पण ताईंनी अट घातली की, जो झोपेल त्याच्या तोंडावर मिशा काढल्या जातील. त्यामुळे कोणालाही झोपता येत नव्हते. शेवटचं ठिकाण आलं, तेव्हा संध्याकाळचे पाच वाजले होते. भंडारा डोंगर हे ते ठिकाण! तिथे संत तुकाराम महाराजांचे छोटे मंदिर आहे. ते आम्हाला दाखवलं. ज्या झाडाखाली बसून तुकाराम महाराज गाथा लिहीत होते असं ठिकाण आम्हाला दाखवलं गेलं. त्यानंतर मग एका काकांचं आम्ही भाषण ऐकलं. परतीच्या प्रवासात बसमध्ये आम्हाला वडापाव दिला गेला. तो खात खात आम्ही परत शाळेत आलो. दुसऱ्या दिवशी मकर संक्रांतीची सुट्टी होती. मला ही सहल खूप आवडली.

**- अद्विका दास**

# चिमणीसाठी दाणा-पाणी

ही गोष्ट आमच्या शाळेतील आहे. एके दिवशी दुपारच्या वेळी मला व माझ्या मित्रांना शाळेच्या मैदानावर एक चिमणी पडलेली दिसली. आम्ही ती अलगद उचलून झाडाच्या पानावर ठेवली व बाईंना सांगितले. वर्गातील सगळी मुले चिमणीची तडफड पाहत होती. बाईंनी त्या चिमणीच्या चोचीत व अंगावर थोडे पाणी टाकले. थंड पाणी मिळताच चिमणीला एकदम हुशारी आली आणि थोड्याच वेळात भुर्रकन उडून गेली.

बाईंनी आम्हाला सांगितलं की, उन्हामुळे तिला तहान लागली असेल. खूप शोधून तिला वेळेत पाणी न मिळाल्यामुळे चक्कर आली असेल. हे ऐकून आम्हाला चिऊताईची दया आली. बाईंनी व आम्ही मुलांनी मिळून चिऊताईसाठी शाळेतल्या झाडांवर पाणी ठेवायचं ठरवलं. पाणी ठेवण्यासाठी आम्ही प्लॅस्टिक, पत्र्याचे डबे शोधले व आम्ही त्यात चिमण्यांसाठी पाणी ठेवू लागलो. काही मुलांनी घरून तांदूळ, डाळ असे धान्यही आणले. आम्ही काही डब्यात थोडे धान्य ठेवले व पाण्याची भांडी झाडांवर लटकवली. आम्ही पक्ष्यांची वाट पाहत होतो. जरा वेळाने काही कावळे येऊन दाणा-पाणी घेताना दिसले. एखाद-दुसरी चिमणीही येऊन यायची. हळूहळू त्या झाडांवर चिमणी, पोपट, कावळे, साळुंक्या असे विविध पक्षी येऊ लागले. ते पाहून आम्हा मुलांना खूप आनंद झाला! आम्ही आता घरीही गॅलरीत पक्ष्यांसाठी दाणा-पाणी ठेवतो. तुम्हीही तुमच्या घरी पक्ष्यांसाठी पाणी नक्की ठेवा.

**विराज पारडे,**
जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, पुणे





**मंजिरी शिंदे,** आठवी
सोनूबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला, मांडवगण



**हर्षाली सप्तर्षी,** सातवी
सोनूबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला, मांडवगण



**भक्ती काळे,** सातवी
राजस्थानी मा. वि. सहयोगनगर, बीड



**गायत्री माने,** सहावी
विश्वकर्मा विद्यालय मराठी प्राथमिक, पुणे



**ओम गुड्डे,** चौथी
जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, पुणे



**कौशिकी फुलसरे,** चौथी
जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा धानोरे, पुणे

? २) भंडारा डोंगरावर कोणाचे मंदिर आहे?

✔ ४) काचेचे व्हायोलिन जपानमध्ये तयार केले आहे.

# बोल 'बढा चढा के'?...

**"आमच्या टेरेसवर फक्त आमचा असा स्विमिंग पूल आहे. आमच्याकडे स्पोर्ट्स कार आहे. ती इतकी 'झूम' जाते ना!" अमृता करत असलेलं वर्णन तिच्या ग्रुपमधल्या मुलामुलींना इतकी 'भारी' वाटत होतं, की प्रणाली, प्रणीता आणि अमोल डोळे मोठे करून, उत्सुकतेने ऐकत होते. पण मुळात अमृताची गाडी या विषयावर आली कशी?... चला पाहूया.**

अमृता, प्रणाली, प्रणीता आणि अमोल सगळेजण सहावीच्या वर्गात शिकायचे. त्यांची परीक्षा तोंडावर आली होती. परीक्षेच्या आदल्या रविवारी प्रणीताच्या घरी जमून अभ्यासाची उजळणी करण्याचा त्यांनी प्लॅन केला. प्रणीताचं घर म्हणजे एक छानसा दोनमजली बंगला होता. पुढे-मागे अंगण होतं, प्रणीताच्या खोलीला लागून तिची स्वत:ची गच्ची होती. संध्याकाळी प्रणीताच्या बाबांनी सर्वांना छत उघडणाऱ्या कारमधून लांबवर चक्करही मारून आणली. त्या वातावरणाने सगळे प्रचंड 'इम्प्रेस' झाले होते.



## अमृताच्या बढाया!

दुसऱ्या दिवशी शाळेच्या मधल्या सुट्टीत तिघांनी प्रणीताला 'कॉम्प्लिमेंट्स' दिल्या. आणि... ते बोलत असताना अचानक अमृता स्वत:च्या घराबद्दल सांगायला लागली. अमृताच्या म्हणण्यानुसार तिचं घर प्रणीतापेक्षा जास्त छान होतं. विशेष म्हणजे अमृताकडे टेरेसवर स्वतंत्र स्मिमिंग पूल आणि स्पोर्ट्स कार आहे म्हटल्यावर सगळ्यांच्या तोंडाचा चंबूच झाला!

अमोल पटकन म्हणाला,"व्वा अमृता! मग परीक्षा संपल्यावर आपण सगळे तुमच्या स्विमिंग पूलमध्ये धमाल करूया का?"

तेव्हा मात्र अमृता गडबडली आणि म्हणाली, "अॅक्च्युअली, माझे आई-बाबा खूप स्ट्रिक्ट आहेत. ते कुणालाच पूल वापरू देत नाहीत."

हे कारण सगळ्यांना विचित्र वाटलं. तेवढ्यात अमृताचे बाबा स्कूटरवरून तिला न्यायला आले.

अमोलने उत्सुकतेने त्यांना विचारलं, "काका, प्लीज आम्हा सगळ्यांना तुमच्या स्विमिंग पूलमध्ये पोहायला अलाऊ करा ना! आम्ही दंगा नाही करणार, नीट वापरू... आणि तुमची स्पोर्ट्स कार दाखवा ना आम्हाला."

> जळकुटेपणातून येणारी स्पर्धा टाळण्यासाठी तुम्ही जॅकलिन टोनर व क्लेअर फ्रीलँड यांचे 'What to Do When It"s Not Fair' हे पुस्तक जरूर वाचा.

## खोटेपणा उघड

अमृताच्या बाबांना अमोल काय विचारतोय, हेच कळेना. पण अमृताचा गोरामोरा चेहरा बघून त्यांना अंदाज आला. ते काय उत्तर द्यावं, हा विचार करत होते, तेवढ्यात अमृता अमोलला म्हणाली, "हा-हा! केली की नाही मजा तुमच्या सगळ्यांची! मी तुम्हाला सगळ्यांना 'बीलेटेड एप्रिल फूल' केलं! आमच्याकडे स्विमिंग पूल आणि स्पोर्ट्स कार नाहीच्चे! फसलात की नाही सगळे!"

अमृता बाबांबरोबर घरी आली. रात्रीच्या जेवणानंतर आई-बाबांनी तिला हाक मारली. ती मान खाली घालून त्यांच्यापुढे उभी राहिली.

बाबा म्हणाले, "आपल्याकडे स्विमिंग पूल आहे, स्पोर्ट्स कार आहे, अशी तू मित्रांपुढे खोटीच बढाई मारलीस ना? तू काही 'बीलेटेड एप्रिल फूल' वगैरे करत नव्हतीस. काय?..."

आई म्हणाली, "अमृता, माझ्या लक्षात आलंय. तू प्रणीताकडे जाऊन आल्यानंतरचा हा बदल आहे. त्यांचा मोठा बंगला, कार, तुमचे झालेले लाड, हे सगळं तुला आवडलं आणि मग आपण तसे श्रीमंत नाहीयोत असा कमीपणा वाटायला लागला. बरोबर?" अमृता काहीच बोलली नाही.

## कमीपणा का वाटून घ्यावा?


बाबा म्हणाले, "हे बघ, अमुक एकजण खूप श्रीमंत आहे, म्हणून आपण स्वत:बद्दल कमीपणा का वाटून घ्यावा? का खोटी बढाई मारावी? का आपल्याला मुद्दाम स्पर्धा करावीशी वाटावी?... प्रत्येक माणसाचं आणि कुटुंबाचं आपलं एक आर्थिक गणित असतं आणि प्रत्येक जण त्याच्या दृष्टीनं जास्तीत जास्त छान जगायचा प्रयत्न करत असतो."

आई म्हणाली, "...आणि प्रणीताचं घर सुंदर आहेच! पण अमृता, मला आपलं घर खूप आवडतं."

अमृता विचार करत होती. तिला लक्षात आलं, की मुळात आई-बाबांना प्रणीताच्या श्रीमंतीशी बरोबरी करावीशी वाटतच नव्हती! ते खरंच समाधानी दिसत होते.

आपण प्रणीताशी बरोबरी करण्याच्या नादात आपल्या घराला आणि आई-बाबांना कमी लेखलं, याबद्दल अमृताला लाज वाटली! उगाच स्पर्धा करण्यापेक्षा, 'जेलस' होण्यापेक्षा आपल्याकडे आता जे आहे, त्यात आणखी समाधान शोधण्याचा धडा तिला आज मिळाला होता!

चित्र रंगवा.



---

सफर गड-किल्ल्यांची

ओंकार ओक

# शिरगावचा भक्कम भुईकोट!

**सर्वसामान्यांना अधिक माहिती नसलेल्या किल्ल्यांमधील एक आहे ठाणे जिल्ह्यातील शिरगावचा भुईकोट! या भव्य किल्ल्यावरून सूर्यास्त पाहणे म्हणजे एक मस्तच अनुभव आहे. कमी वेळात पाहून होणाऱ्या या किल्ल्याविषयी आज थोडेसे जाणून घेऊया.**



जिल्हा : ठाणे

**जायचे कसे?**
ठाणे जिल्ह्यातील पालघरहून ८ किलोमीटरवरील शिरगावला थेट गाडीमार्ग आहे. पालघर सातपाटी मार्गावर हा किल्ला येतो.

**जेवणाची सोय**
जेवणाचा डबा बरोबर ठेवावा. पालघर इथे उत्तम हॉटेल्सही आहेत.

**पाण्याची सोय**
किल्ल्यावर पिण्याचे पाणी नाही.



**'भुईकोट' हा किती छान शब्द आहे नाही का?... इथे 'भुई' म्हणजे भूमी- अर्थात जमीन आणि 'कोट' म्हणजे किल्ला. जमिनीवर बांधलेला किल्ला. ठाणे जिल्ह्यात जे मोजके भुईकोट किल्ले आहेत, त्यातला एक अतिशय देखणा किल्ला म्हणजे शिरगावचा किल्ला. या किल्ल्याच्या बाहेरूनच त्याच्या भव्यतेची कल्पना येते. एखाद्या अनुभवी ट्रेकला मार्गदर्शक म्हणून बरोबर घेऊन तुम्हीही हा किल्ला जरूर पाहून या.**

- या किल्ल्याला सुरुवातीला दोन दरवाजे आहेत. आज जाताना उजवीकडच्या तटावर '१७१४' असे वर्ष कोरले आहे.
- गडाला एकूण पाच बुरुज असून काही सुंदर घुमट असलेले टेहळणीचे मनोरेदेखील आहेत. इथे बसून सूर्यास्ताचा अनुभव घेणे हा एक अप्रतिम कार्यक्रम आहे.
- किल्ल्याची तटबंदी आजही खंबीरपणे उभी असून आतमध्ये कोठारांचे आणि वाड्याचे अवशेष पाहायला मिळतात.
- किल्ल्यात पाण्याची सोय मात्र कुठेही दिसत नाही.
- संपूर्ण किल्ला तासाभरात पाहून होतो.



? ३) शिरगावचा भुईकोट किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे?

✔ १) 'डेक्स्टर्स लॅबरोटरी' ही मालिका जेनेडी तार्ताकोव्हस्की यांनी साकारली.

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत या वेळी काय काय आहे ते बघूया.



# विक्रमांची अजब दुनिया



## रुबिक क्यूब सोडवण्याचा विक्रम

मॅक्स या २४ वर्षांच्या तरुणाने '४*४*४' रुबिक क्यूब केवळ १५.७१ सेकंदांत सोडवून दाखवला आहे. तर '७*७*७' रुबिक क्यूब केवळ १ मिनीट आणि ३४.१५ सेकंदांत सोडवून दाखवला आहे. मॅक्सच्या नावावर असे आणखी ५ जागतिक विक्रम आहेत बरे! मॅक्स आता २४ वर्षांचा असला, तरी २ वर्षांचा असतानाच त्याला 'ऑटिझम' म्हणजे स्वमग्नता या आजाराचे निदान झाले होते. या आजारात व्यक्तिला विविध समस्यांचा सामना करावा लागू शकतो. परंतु मॅक्सला रुबिक क्यूब सोडवण्यात खूप आनंद मिळू लागला आणि त्यात त्याचे मन रमले. तो रुबिक क्यूब सोडवण्याच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊ लागला, या निमित्ताने त्याला नवीन लोक भेटू लागले. त्यामुळे त्याला लोकांमध्ये मिसळण्याचा सराव झाला. 'रुबिक क्यूब सोडवण्याच्या खेळाने आमच्या मुलाला एक प्रकारे जीवनदानच दिले,' असेच त्याचे वडील सांगतात.



## जुळी कुत्र्याची पिल्ले

अगदी सारखी दिसणारी जुळी बाळे तुम्ही पाहिली असतील. पण माणूस सोडून इतर प्राण्यांची पिलेसुद्धा जुळी असू शकतात, हे कधी ऐकले आहे का?... याचाही पुरावा आहे आणि एक विक्रम म्हणून त्याची 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंदसुद्धा झालीय. २०१४ मध्ये दक्षिण आफ्रिकेत 'आयरिश वुल्फहाउंड' प्रजातीच्या एका कुत्रीने अगदी एकसारख्या दिसणाऱ्या दोन पिलांना जन्म दिला. रोम्युलस आणि क्युलन अशी नावे असलेली ही पिले शास्त्रीयदृष्ट्या तपासणी होऊन 'आयडेंटिकल' जुळी म्हणून घोषित केलेली पहिली पिले ठरली. माणसांमध्ये जवळपास २५० बाळांमध्ये १ बाळ एकसारख्या दिसणाऱ्या जुळ्यांपैकी असते. पण इतर प्राण्यांत असे होण्याचे प्रमाण खूपच दुर्मीळ आहे. रोम्युलस आणि क्युलनला त्याच वेळी जन्मलेली आणखी ५ भावंडे आहेत, पण या सगळ्यांत एकसारखे दिसणारे जुळे हे दोघेच निघाले. आहे ना मजा!

## चक्क काचेचे व्हायोलिन

'हारिओ' या काचवस्तू बनवणाऱ्या जपानी कंपनीने चक्क काचेचे व्हायोलिन बनवले आहे. त्याचे वैशिष्ट्य असे, की ते फक्त शोभेचे नाही. नेहमीच्या व्हायोलिनसारखे हे काचेचे व्हायोलिनही वाजवता येते. काचेपासून विविध आकार तयार करण्यासाठी काच वितळवून मऊ केली जाते. अतिउष्ण काचेचा गोळा धातूच्या लांब नळीच्या एका टोकाला चिकटवला जातो. सातत्याने काचेला उष्णता देत नळीच्या दुसऱ्या टोकातून हवा फुंकली जाते आणि ते करतानाच एकीकडे काचेला हवा तो आकार दिला जातो. ही प्रक्रिया अवघड, जोखमीची व कौशल्याची असते. म्हणजे व्हायोलिनचा आकार तयार करणे किती कौशल्याचे असेल याचा विचार करा! हे व्हायोलिन वाजवण्यासाठी तुम्हाला मोजावे लागतील फक्त ३१ लाख रुपये!





## क्रोशाच्या सर्वाधिक वस्तूंची मांडणी



क्रोशाची विशिष्ट प्रकारची सुई वापरून दोरा वा लोकरीपासून लहान लहान वस्तू वा कापड तयार केले जाते. याला क्रोशाकाम म्हणतात. 'मदर इंडियाज क्रोशा क्वीन्स' या भारतीय स्त्रियांच्या गटाने या कलेतून एक विक्रम स्थापन केलाय. त्यांनी तब्बल ५८,९१७ क्रोशाकामाच्या आकृती तयार केल्या आणि त्यांचे प्रदर्शन मांडले. त्याची 'गिनिज वर्ल्ड रेकॉर्ड्स'मध्ये नोंद झाली. या आकृतींमध्ये विविध प्रकारच्या मानवी आकृतीसुद्धा आहेत. या पिटुकल्या, क्यूट बाहुल्यांसाठी चटई, फळे, दप्तर अशा लहान लहान वस्तूही बनवण्यात आल्या आहेत. तुम्हाला आवडेल का क्रोशाकामाची कला शिकायला?...


स्क्रीन टाइम

## द एलिफंट व्हिस्परर्स (२०२२)



## कशासाठी बघायचा चित्रपट?

- जंगल आणि प्राण्यांविषयीचे प्रेम हा चित्रपट पाहून नक्की द्विगुणित होईल.
- ही गोष्ट सांगताना त्याचे चित्रीकरण करणाऱ्या दिग्दर्शिका व तिच्या टीमला किती कष्ट घ्यावे लागले असतील, याचीही कल्पना आपल्याला येते. 'वाइल्डलाइफ फोटोग्राफी' या वेगळ्या करिअर क्षेत्राची या निमित्ताने तुम्हाला ओळख करून घेता येईल.



# हत्ती आणि माणसांचे कुटुंब!

दोस्तांनो, कुत्रा आणि मांजर हे आपले मित्र कसे होऊ शकतात, हे आपल्याला माहिती आहेच. पण हत्ती एखाद्याचे मित्र; नव्हे कुटुंबच झाले तर?... 'द एलिफंट व्हिस्परर्स' ही खरीखुरी गोष्ट आहे हत्ती आणि माणसांच्या मैत्रीची. तमिळनाडूमधल्या 'मुदुमलाई व्याघ्र प्रकल्पा'तील हत्तींच्या संरक्षणासाठी काम करणाऱ्या साध्या माणसांची ही छान कथा आहे.

### चित्रपटाची गोष्ट

रघू हे हत्तीचे पिल्लू या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. रघूची आई विजेच्या तारेचा झटका बसून मरण पावते आणि तो आपल्या कळपापासून वेगळा होतो. जखमीसुद्धा होतो. पारंपरिकरीत्या हत्तींचा सांभाळ करणाऱ्या 'कट्टूनायकन' या जमातीचे लोक वनविभागाला सहाय्य करतात. त्यातील बोम्मन आणि बेली या जोडप्याकडे रघूला काळजी घेण्यासाठी सोपवले जाते. अगदी स्वतःचे बाळ असावे, अशा पद्धतीने बोम्मन आणि बेली रघूला सांभाळतात. जेव्हा रघू ऐकत नाही, तेव्हा ते त्याला खोटे-खोटे रागावतातही; पण त्याच्यावर नेहमी प्रेमच करतात. पुढे एक अमू नावाचे हत्तीचे पिल्लू त्यांना येऊन मिळते. हे सगळे जणू एकमेकांचे कुटुंबीय होतात. जंगलात राहणारी साधी माणसे आणि प्राण्यांचे सहजीवन दाखवणारी ही कथा लहान लहान हृद्य प्रसंगांमधून पुढे जाते. इतर चित्रपटांत असते तशी या चित्रपटात मसालेदार दृश्ये नाहीत. पण जंगल वाचवणे आणि जंगली प्राण्यांना जगू देणे हे पर्यावरणासाठी महत्त्वाचे आहे, हे सांगणारी, माणसांनी एकत्र येऊन केलेल्या प्रयत्नांची ही प्रेरक आणि भावना जागवणारी गोष्ट आहे. रघू, अमू आणि बोम्मन-बेली यांच्या गोष्टीत तुम्ही गुंतून जाल.

### चित्रपटाची वैशिष्ट्ये

दिग्दर्शिका व वाईल्डलाइफ फोटोग्राफर कार्तिकी गोन्साल्विस आणि निर्माती गुनित मोंगा यांनी हा लघु-माहितीपट बनवला आहे. त्याला २०२३ मध्ये 'अकॅडमी अवॉर्ड' अर्थात 'ऑस्कर' पुरस्कार मिळाला. संपूर्ण कुटुंबाने एकत्र बसून बघावा असा हा सुंदर लघुपट 'नेटफ्लिक्स'वर उपलब्ध आहे.

माय रेसिपी

दोस्तांनो, तुम्हाला सोलकढी कदाचित माहिती असेल. कोंकणी वा मालवणी पद्धतीच्या जेवणाबरोबर हे चविष्ट पेय दिले जाते. त्यात आमसूल- म्हणजेच कोकम आणि नारळाचे दूध घातलेले असते. पण नारळाचे दूध न घालतासुद्धा झटपट सोलकढी करता येते. आज आपण सोलकढी करण्याची ही अगदी सोपी पद्धत पाहूया.

## ताकाची सोलकढी

### साहित्य

ताक अर्धा लिटर (अंदाजे अडीच ग्लास), कोकमाचे आगळ (म्हणजे कोकमाचा साखर न घातलेला खारा अर्क. हा 'कोकम आगळ' या नावाने बाजारात मिळतो.), साखर २-३ चमचे, लसूण पाकळी- १ मोठी, फोडणीसाठी तेल- १ टेबलस्पून, जिरे- अर्धा टीस्पून, १ हिरवी मिरची.

### कृती

ताकात १ मोठी लसणाची पाकळी ठेचून घाला. त्यात अंदाजाने थोडे-थोडे करत कोकमाचे आगळ घाला. ढवळल्यावर ताकाचा रंग छान गुलाबी होईल इतकेच कोकम आगळ घालायचे आहे. कोकम आगळमध्ये मीठ असतेच, त्यामुळे आपल्याला वेगळे मीठ घालायला लागत नाही. आता ताकाची चव पाहून आंबट-खारट चवीला संतुलित करण्यासाठी अंदाजाने २-३ चमचे साखर घालून ढवळा. पुन्हा चव बघा. मीठ-साखर व आंबटपणाचे प्रमाण चटकदार जमून यायला हवे. गॅस पेटवून मंद आचेवर फोडणीचे भांडे गरम करा. त्यात तेल तापवा. तेल तापलेले दिसताच आच बंद करा. या तेलात अर्धा टीस्पून जिरे घाला. तेल गरम असल्याने जिरे लगेच तडतडेल व आच बंद केल्यामुळे फोडणी जळणार नाही. जिरे तडतडले की लगेच तेलात १ हिरवी मिरची तोडून घाला. ही फोडणी तयार करून ठेवलेल्या ताकावर घाला आणि छान ढवळा. आवडत असल्यास वरून कोथिंबीर घाला. ताकाची चविष्ट सोलकधी प्यायला तयार!

### हे लक्षात ठेवा

फोडणी करताना गॅस वापरावा लागणार आहे. त्यामुळे आई-बाबा शेजारी असलेले बरे.

## प्रयोग करा

खरेतर सोलकढीत नारळाचे दूधच घालायचे असते. आपण केवळ ती सोपी करण्यासाठी ताक वापरले आहे. कधीतरी आई-बाबांच्या मदतीने नारळाचे दूध घरी करून वा तयार आणून त्याची सोलकढी करून पहा, म्हणजे तुम्हाला दोन्हीच्या चवीतला फरक लक्षात येईल.





पेटोपिया

# ओळखा पाहू मी कोण?

आपण आतापर्यंत कुत्रा आणि मांजरांच्या वेगवेगळ्या प्रजातींची माहिती घेतली. यातल्या किती प्रजाती तुम्हाला ओळखता येतील? आज आपण काही कोडी बघूया. त्यात दिलेल्या माहितीवरून तुम्हाला या प्रजातींची नावे ओळखता येतील का?... 'गूगल'वर शोधून चीटिंग करायची नाही बरं का!

**१**
चंचल आहे
मी कुत्रा
रंग माझा
शुभ्र पांढरा
ठिपके काळे
अंगावर
मी हसरा आणि
खेळकर!

**२**
हवा पाहिजे मला थंड
सायबेरियाचा मी
श्वान
निळसर डोळे,
त्रिकोणी कान
नाक तीक्ष्ण, ताठ मान
मऊ मऊ माझी फर
माझ्याशी मैत्री कर!

**३**
इजिप्तवरून नाव माझे
पण गाव इजिप्त नाही!
मी आगळीवेगळी मांजर
अंगावर माझ्या नाही फर
चेहरा दिसला रागीट जरी
मैत्रीण तुमची मी खरी!

**४**
माझी फर सोनेरी
खाली पाडलेले
मऊ कान
खेळायला लागते
मला खूप
मैत्रीपूर्ण मी
श्वान!

**५**
चॉकलेटी फर,
काळी पाठ
राखणदार म्हणून
आहे थाट
कान तीक्ष्ण अन्
अंग भरदार
जणू आहे शूर
सरदार!

(उत्तरांसाठी पान १० पहा.)







खेळ खेळूयात

# रिले बॉल प्ले!!

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख

नियंत्रण आणि समन्वय वाढवण्यासाठीचा हा खेळ आहे. यासाठी लागणार आहे फुटबॉल, व्हॉलिबॉलच्या आकाराचे काही मोठे चेंडू.

### कृती

- खेळाडूंचे समान गट करून घ्यावेत. एक आरंभरेषा आणि एक अंतिमरेषा साधारणतः ५० फुटांवर आखावी. गटातील एक खेळाडू अंतिम रेषेजवळ उभे करावा.
- शिट्टी होताच गटातील खेळाडूंनी आपला चेंडू खालील प्रकार करत अंतिम रेषेपर्यंत घेऊन जावा

१. चेंडूचा एका हाताने टप्पा टाकत.
२. चेंडूचा दोन्ही हातांनी टप्पा टाकत.
३. एक हात मागे बांधून टप्पा टाकत.
४. चेंडू दोन गुडघ्याच्या मध्ये धरून चालत वा उड्या मारत
५. दोन खेळाडूंनी डोक्यांच्या मध्ये चेंडू पकडून एकत्र चालत जाणे.
६. दोन खेळाडूंनी पाठीवर चेंडू पकडून एकत्र चालत जाणे.

- हे करत असताना चेंडू खाली पडला, तर खेळाडू बाद होतो. अशा प्रकारे सर्व खेळाडू राखून सर्व पायऱ्या पूर्ण करणारा गट विजयी होतो.

### कौशल्ये

- या खेळात हातापायांची ताकद वाढते. वेग वाढतो. एकाग्रता वाढते.
- या खेळ सर्व खेळांना पूरक आहे.



ॲप माझे

## स्टारफॉल
(संकेतस्थळ)

Starfall®

## इंग्लिश-गणिताला पूरक

**कोणासाठी?**

- मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांना इंग्लिश स्पेलिंग सुधारण्यासाठी
- मूलभूत गणिती संकल्पनांच्या उजळणीसाठी

**मराठी माध्यमात शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना इंग्लिश अवघड वाटते. त्यातही स्पेलिंग हा घाबरवणारा भाग असतो. स्पेलिंगची भीती जाण्यासाठी https://www.starfall.com/h/ या संकेतस्थळावरील खेळांचा चांगला उपयोग करून घेता येईल. फावल्या वेळात इतर गेम्स खेळण्यापेक्षा इंग्लिश व गणिताचे हे खेळ निश्चित चांगले!**

### संकेतस्थळावर काय काय?

- या संकेतस्थळावर प्रथम आपल्याला हवी ती 'ग्रेड' (इयत्ता) निवडावी लागते.
- बालवाडी, पहिली ते तिसरी आणि चौथी-पाचवी अशा तीन खणांत ॲक्टिव्हिटी विभागलेल्या आहेत.
- मराठी माध्यमात शिकणाऱ्या ज्या मुलांचे इंग्लिश व गणित पक्के नाही, अशा सातवीपर्यंतच्या मुलांना या ॲक्टिव्हिटी वापरता येतील. त्या वापरताना इंग्लिशचा वापर नक्की सुधारेल.
- काही ॲक्टिव्हिटीच मोफत आहेत. उदा. इंग्लिश स्पेलिंग सुधारण्यासाठी 'हायबरनेट स्पेलिंग बी'. यात सोपा 'क्लू' (कोडे) दिलेला असतो आणि त्यावरून तो शब्द ओळखून योग्य स्पेलिंगवर 'क्लिक' करायचे असते.
- गणितात भागाकार व अपूर्णांकांच्या भागाकाराची उजळणी करता येते.
- कार्टूनच्या वापरामुळे मुलांना या ॲक्टिव्हिटींमध्ये रस वाटेल.

### हे नक्की वाचा

- मुलांनी इंग्लिश स्पेलिंग क्विझमध्ये दिलेले कोडे वाचताना पालक वा शिक्षकांची मदत घेतल्यास त्यांना ते चांगले कळेल व शब्द ओळखणे सोपे जाईल.
- सहावीपर्यंतच्या मुलांना या संकेतस्थळाचा अधिक चांगला उपयोग होईल.
- हे पूरक संकेतस्थळ आहे. हा शाळेचा अभ्यास नव्हे!

CYBER SECURITY
Net Protector
NPAV
Total Security
922.566.48.17
922.566.48.11
Mobile Security

? ५) 'स्टारफॉल' संकेतस्थळावर इंग्लिशबरोबर कोणत्या विषयातील मूलभूत संकल्पनांची उजळणी करता येते?

✓ ३) शिरगावचा भुईकोट किल्ला ठाणे जिल्ह्यात आहे.

# CAMPING SITE

Alchemize

## Donating Extra Water

Person 1: I'm running low on water. Can I have some?
Person 2: Sure, I have extra! I packed more than needed.
Person 1: Thanks! It's really hot today.
Person 2: No problem! Let's all stay hydrated.

## Donating Camping Gear

Person 1: I have an old sleeping bag. Should I leave it here?
Person 2: You could donate it to the adventure group in the town. They help underprivileged kids go camping.
Person 1: That's a great idea! I'll drop it off.
Person 2: They'll be so grateful!

## Donating Snacks

Person 1: Running out of snacks! Do you have any extra?
Person 2: I brought some extra trail mix. Want some?
Person 1: Thanks! This will keep me going.
Person 2: Let's share with others too!

## Donation for Renovation

Person 1: I heard the campsite needs donations for repairs.
Person 2: Yes, I'm planning to donate. I love this place.
Person 1: I'll contribute too. It's worth it.
Person 2: Thanks! Every bit helps.

## Donating to a Local Tribe


Person 1: The local tribe could use some help. Should we donate?
Person 2: Yes, we can give clothes and food.
Person 1: I'll organize a small collection.
Person 2: Great! It will make a difference.

## Donating Old Camping Equipment

Person 1: I have a spare tent. I don't need it anymore.
Person 2: You can donate it to the local group that organizes camps for kids. They'll really appreciate it.
Person 1: That's a good idea. I'll hand it over to them on our way back.

## Donating to an Environmental Cause

Person 1: This place needs some cleaning. Should we help out?
Person 2: Absolutely! Let's pick up some trash and donate to the local environmental group.
Person 1: Great idea! Let's make this campsite even better for others.



# ESSAY WRITING

## How to Write a Persuasive Essay?

Last time, we learned about expository essays. This time, we will explore how to write a persuasive essay, where your goal is to convince the reader to agree with your opinion or take a specific action.

A persuasive essay is written to persuade or convince the reader to adopt your point of view on a particular issue. It requires the use of logical arguments, strong evidence, and emotional appeal. Unlike an expository essay, which only informs, a persuasive essay aims to convince the reader to take your side.

## Steps to Write a Persuasive Essay :

1. Choose a Controversial Topic: Pick a topic that you feel strongly about, such as school uniforms, environmental issues, or technology use.
2. Research Your Topic: Gather strong facts, statistics, and examples to back up your opinion.
3. Write a Clear Thesis Statement : In your introduction, clearly state your opinion and what you want the reader to believe or do.
4. Develop Persuasive Arguments : Each body paragraph should present a strong argument supporting your thesis. Use facts, expert opinions, and emotional appeals.
5. Address Opposing Views: Acknowledge the other side of the argument and explain why your point of view is stronger.
6. Conclude with a Call to Action : End your essay by summarizing your main points and urging the reader to take action or agree with your view.

## Example Topics :

Why Homework Should Be Reduced : Persuade your reader that too much homework is harmful to students.

The Importance of Protecting Wildlife : Convince others that it's crucial to protect endangered species and their habitats.

## Sample Sentence :

"Reducing homework would allow students more time to relax, pursue hobbies, and improve their mental health, which ultimately leads to better academic performance."

A persuasive essay helps you argue your point of view effectively, encouraging readers to consider your perspective and take action!

Alphabet Express

शीतल करंदीकर

दोस्तांनो, आज 'Alphabet Express' मध्ये S ने संगळ्यांसोबत आपला प्रवास सुरू केला आहे. सगळ्यांना S ने काय आणले असेल याची उत्सुकता आहे. त्यामुळे त्यांनी त्याला आग्रहाने पुढचं स्टेशन यायच्या आत आपली शिदोरी उघडायला सांगितली आहे. S ने या आग्रहाला मान देऊन त्याची शिदोरी उघडून सर्वांसमोर एकएक शब्द बाहेर काढायला सुरुवात केली आहे. पाहूया आपणही त्याने कायकाय आणलंय ते!

# S अक्षराचा वापर

१) sophisticated = (उच्चार : सोफिस्टिकेटेड) = अत्याधुनिकरित्या प्रभावी = Everyone was impressed by her sophisticated behaviour.

२) surrender = (सरेंडर) = आत्मसमर्पण करणे, हार पत्करणे = The enemy accepted its defeat and surrendered.

३) slow and steady = (स्लो अँड स्टेडी) = सावकाश; पण स्थिर = He is making slow and steady progress in his business.

४) suspicion = (सस्पीशियन) = संशय = His mother's mind was full of suspicion for his friend.

५) slay = (स्ले) = हत्या करणे = The dacoits slayed every passer-by, that night.

६) swivel = (स्वीवेल) = फिरकीसारखे गोल फिरणे किंवा फिरवणे = She loved to swivel her chair while talking on the phone.

७) swirl = (स्वर्ल) = गरगर फिरवणे = He picked the gangster and swirled him in the air.

८) slumber = (स्लंबर) = झोप = Bears fall into deep slumber for a long time every year.

९) sly = (स्लाय) = कावेबाज = The fox is always thought of as a sly animal.

१०) shrink = (श्रिंक) = आटणे = I was afraid that my cotton clothes might shrink in just one wash.

११) shovel = (शॉवेल) = फावडे = A gardener uses a shovel to clear out excess mud.

१२) sarcastic = (सारकास्टिक) = उपहासात्मक = The leader made a sarcastic comment on the performance of the team.

१३) slit = (स्लिट) = चीर पाडणे – The head chef told the junior chef to slit open a bowl full of chillies.

१४) stir = (स्टर) = ढवळणे = Her mother told her to stir the milk till the sugar in it had dissolved.

१५) shred = (श्रेड) = अगदी छोटे आणि लांब तुकडे करणे = She shred the cabbage and carrots very finely.


१६) shabby = (शॅबी) = अजागळ = He dresses in a very shabby manner.

१७) steadfast = (स्टेडफास्ट) = ठाम = He stood steadfast on his decision.

१८) shin = (शिन) = नडगी; पायाचा पुढचा भाग - पाऊलाच्या वरती असलेला = The football player hurt his shin badly and had to leave the game mid-way.

१९) shy = (शाय) = लाजाळू = The little girl was shy and would not talk with the guests.

२०) sprout = (स्प्राऊट) = अंकुरणे = I drained the soaked green gram and left it to sprout overnight.



अशा तऱ्हेने S ने आपली शिदोरी सर्वांसमोर खुली केली. या शब्दांचा आस्वाद लुटत आणि त्याबद्दल बोलत या सर्व अक्षरांची धमाल शब्दसफर जोरात चालू आहे. आजच्या गंमतपाठाचा भाग म्हणून आपल्याला S पासून सुरू होणारे अधिकाधिक शब्द शोधायचे आहेत आणि यांच्या अंगतपंगतीचा भाग व्हायचंय.



STORY

# THE BIG IDEA

Siddhi Sathe

In the bustling city of Rajpur, there lived a young girl named Kavya. She loved painting, and her walls were covered with colorful pictures of animals, landscapes, and people. But despite her talent, Kavya didn't think her paintings could be anything more than a hobby.

One afternoon, while walking to the market, Kavya noticed a poster that said, "Art Exhibition – Open for All Artists!" Her heart skipped a beat. The idea of showcasing her paintings to the public excited her, but doubt crept in. "Who would be interested in my work?" she thought.

Later that evening, Kavya shared her thoughts with her grandmother, who always encouraged her to dream big. "Grandma, I'm not sure I can do it. My paintings are just for me."

Her grandmother smiled warmly. "Kavya, you are a talented artist. But the world only sees what you are willing to show them. Think bigger! Imagine how your art could inspire others."


Inspired by her grandmother's words, Kavya decided to submit her paintings to the exhibition. She worked hard, preparing her best pieces, and even made a few new ones. But when the day of the exhibition arrived, Kavya was nervous. She wondered if anyone would even notice her paintings.

To her surprise, people gathered around her display, admiring her work. The colors, the emotions, and the stories behind each painting spoke to everyone. A local gallery owner even offered to showcase her paintings in their gallery.

Kavya couldn't believe it. She had taken a leap of faith, thought bigger, and it had changed everything. Her paintings were now reaching more people than she had ever imagined.

From then on, Kavya never doubted the power of dreaming big.

MYSTERIOUS WORD: _ _ _ _ _ _ _ _ _



| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| G | O | D | R | E | T | S | O | O | R |
| D | O | S | H | E | E | P | E | G | G |
| O | H | O | C | O | W | G | L | A | S |
| N | M | O | S | C | G | R | A | R | D |
| K | O | N | R | E | I | A | R | D | R |
| E | L | I | A | S | P | S | U | E | A |
| Y | E | A | R | E | E | S | R | N | H |
| C | K | R | R | E | M | R | A | F | C |
| R | A | G | T | I | B | B | A | R | R |
| T | R | A | C | T | O | R | O | W | O |

COW
DOG
DONKEY
EGG
FARMER
GARDEN
GOOSE
GRAIN
GRASS
HORSE
MOLE
ORCHARD
PIG
RABBIT
RAKE
ROOSTER
RURAL
SHEEP
TRACTOR




GRAMMAR BITE

# Portmanteaus




A portmanteau is a word formed by blending two words together to create a new one, combining both sounds and meanings. These fun and creative words often emerge in pop culture, technology, and everyday language.

Examples:

1. Brunch
   A combination of "breakfast" and "lunch."
   Example: "Let's meet for brunch at 11 a.m."
2. Smog
   A blend of "smoke" and "fog."
   Example: "The city was covered in smog this morning."
3. Motel
   A fusion of "motor" and "hotel."
   Example: "We stayed at a motel during our road trip."
4. Infomercial
   A mix of "information" and "commercial."
   Example: "I saw an infomercial about the latest blender."

Portmanteaus are a creative way to shorten phrases and make language more efficient, all while adding a fun twist!

## सुभाषित

**इदमेव हि पाण्डित्यं चातुर्यमिदमेव च ।**
**इदमेव सद्बुद्धित्वं मा यादल्पतरो व्यय: ।।**

मिळकतीपेक्षा कमी खर्च करणे हेच शहाणपण, हीच चतुराई आणि हीच सद्बुद्धी होय.

# संस्कार

**आनंददायी शनिवार**

## सुविचार

स्वप्ने नवसाने नाहीत, तर परिश्रमांनी पूर्ण होतात.

## गीता श्लोक

**श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ।**
**ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ॥**

मर्म न जाणता केलेल्या अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे. ज्ञानापेक्षा परमेश्वराच्या स्वरूपाचे ध्यान श्रेष्ठ आहे आणि ध्यानापेक्षाही सर्व कर्मांच्या फळांचा त्याग श्रेष्ठ आहे. कारण त्यागाने ताबडतोब परमशांती मिळते.

## दिनविशेष



**१२ एप्रिल**

**१९९८ :** देशात साठच्या दशकात हरितक्रांती घडवून आणण्यात मोलाची कामगिरी बजावणारे सी. सुब्रह्मण्यम यांना 'भारतरत्न' हा सर्वोच्च सन्मान प्रदान.



**१४ एप्रिल**

**१९९९ :** क्रिकेटमधील ५० महान खेळाडूंच्या 'हॉल ऑफ फेम' यादीत भारताचे सुनील गावसकर, बिशनसिंग बेदी आणि कपिलदेव यांचा समावेश.



**१५ एप्रिल**

**१९५० :** आचार्य विनोबा भावे यांनी आंध्र प्रदेशातील पोचमपल्ली येथे 'भूदान' चळवळ सुरू केली.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर



# गैरसमज

**प्राचीन काळी वर्धमान नावाचे एक नगर होते. या नगरात श्रीजय नावाचा राजा राज्यकारभार करत होता. तेथे असणाऱ्या अनेक व्यापाऱ्यांपैकी दंतिलशेठ नावाच्या व्यापाऱ्याचा आणि राजाचा खूप स्नेह होता.** दंतिलशेठच्या मुलीचे लग्न ठरले. विवाहासाठी श्रीजय राजा व त्याचा परिवार उपस्थित होता. राजपरिवारामध्ये काम करणारा गोरंभ नावाचा नोकर सर्वांबरोबर आला होता. दंतिलशेठकडून सर्वांचा सन्मान झाला, पण गोरंभचा सन्मान राहून गेला. याचा गोरंभला राग आला. आपण नोकर असलो म्हणून काय झालं? राजघराण्याचे नोकर आहोत याचे भान दंतिलशेठला असायला हवे असे त्याला वाटले. अपमानाचा बदला घ्यायचा असा विचार त्याच्या डोक्यात आला.

एके दिवशी राजा झोपलेल्या पलंगाजवळ पहारा देण्याची जबाबदारी त्याच्यावर आली. राजा अर्धवट झोपेत आहे, हे पाहून स्वतः गोरंभ झोपेचे नाटक करून म्हणाला, ''हा दंतिलशेठ मोठा लबाड आहे. राजाचे राज्य हिरावून घेण्याचा त्याचा डाव आहे.'' गोरंभचे हे शब्द ऐकताच राजा खडबडून जागा झाला. त्याने दंतिलशेठशी संबंध तोडून टाकले. त्याला दरबारात यायला मनाई केली. दंतिलशेठच्या काहीच लक्षात येईना. एके दिवशी त्याची व गोरंभची भेट झाली, पण गोरंभ फणकाऱ्यात त्याच्याशी न बोलता निघून गेला. दंतिलशेठच्या लक्षात आले, राजा आपल्याशी बोलत नाही हे गोरंभचेच कारस्थान असावे. मग त्याने एके दिवशी गोरंभला घरी बोलावले, त्याला गोडधोड जेवण केले, महागडी वस्त्रे देऊन त्याचा सन्मान केला. यावर गोरंभ म्हणाला, ''शेठजी इथून पुढे महाराज तुमच्यावर रागवणार नाहीत. त्यांचा राग जाईल.'' मग काही दिवसांनी पहाऱ्यावर असताना राजा अर्धवट झोपेत असताना स्वतः झोपल्याचे सोंग घेऊन गोरंभ म्हणाला. ''आपले महाराज खादाड आहेत. दरबार सुरू असतानाही ते काकड्या खात असतात.'' त्याचे हे शब्द ऐकताच महाराज म्हणाले, ''गोरंभ काय म्हणालास?'' तो उत्तरला, ''महाराज माफ करा, मला झोपेत बडबडायची सवय आहे, पण ते खरेच असते असं नाही.'' मग महाराजांच्या लक्षात आले की, मागे गोरंभ दंतिलशेठविषयी झोपेत बोलला ते खोटे असले पाहिजे. राजाचा गैरसमज दूर झाला आणि मग राजाने सन्मानाने दंतिलशेठला बोलावले व दोघांचा स्नेह पूर्वीसारखा सुरू झाला.

## गुड मॅनर्स

# सार्वजनिक मालमत्तांची घ्या काळजी!

**दोस्तांनो, तुमचे घर, घरातील विविध वस्तू, खेळणी, सायकल वगैरे गोष्टी या फक्त तुमच्या असतात. याचाच अर्थ ती तुमची खासगी मालमत्ता झाली. मात्र, आपल्या काही सार्वजनिक मालमत्तादेखील असतात. त्यांचा वापर आपण सर्व मिळून करत असतो. जसे की, एसटी बस व रेल्वेसारखी सरकारी वाहने, सरकारी कार्यालयांमधील वस्तू, सार्वजनिक स्वच्छतागृहे, रस्त्यांवरचे दिवे, पदपथ, उद्याने... ही आपली सार्वजनिक मालमत्ता आहे. त्यांची काळजी घेणे ही आपल्या सर्वांची नागरिक म्हणून जबाबदारी आहे.**



आपल्यापैकी अनेक लोक बस किंवा रेल्वेतील आसने फाडतात, दिवे-पंखे सुरूच ठेवतात, खिडक्या जोरात उघडतात, प्रसाधनगृहांमध्ये स्वच्छता ठेवत नाहीत. त्यामुळे सर्वांची गैरसोय होते आणि त्या व्यवस्थेसाठी सरकार जो निधी म्हणजेच पैसा देते तोही वाया जातो. आपल्या देशाची प्रतिमा खराब होते. अनेक लोक रस्त्यांवर अस्वच्छता करतात, थुंकतात, रेल्वेच्या फलाटावर कचरा टाकतात, उघड्यावर नैसर्गिक विधी करतात. हे अत्यंत चुकीचे आहे. हे अजिबातच 'गुड मॅनर्स' नाहीत बरं का!

तुमच्या ओळखीत कोणी असे करत असेल किंवा प्रवासात असे कोणी वागताना दिसले, तर त्याला नम्रतेने सांगा. त्यासाठी गरज पडल्यास मोठ्या माणसांची मदत घ्या.

सार्वजनिक वीजेची चोरी करणे, पाण्याचा सार्वजनिक नळ सुरू ठेवणे, या गोष्टींमुळेदेखील सार्वजनिक मालमत्तेची हानी होते बरं का! आपण सर्व या देशाचे नागरिक आहोत आणि आपण या सर्व गोष्टींचा वापर करण्यासाठी करही भरतो. त्यामुळे एका अर्थाने ही आपल्याच सगळ्यांच्या पैशांची नासधूस आहे हे समजून घ्यायला हवे.

## अवकाश

सदानंद होशिंग

# ग्रहविचार

**आज आपण जाणून घेणार आहोत ते ग्रहमंडलातील सर्वांत मोठ्या ग्रहाविषयी. या ग्रहाचे नाव गुरू किंवा बृहस्पती असे आहे. याला इंग्रजीत 'ज्युपिटर' या नावाने ओळखतात. हा ग्रह प्रामुख्याने हेलियम आणि हायड्रोजन या वायूंनी बनलेला आहे. गुरू ग्रहाच्या वातावरणात मिथेन, पाण्याची वाफ, अमोनिया व खडक यांचे अंश आहेत. या व्यतिरिक्त कार्बन, इथेन, हायड्रोजन सल्फाइड, निऑन, ऑक्सिजन, फॉस्फिन व गंधक यांचेही अंश आहेत. त्याला इतर जड मूलद्रव्यांचा उच्च दाबाखालील खडकाळ गाभा असणे शक्य आहे.**



गुरूच्या जलद परिवलनामुळे त्याचा आकार गोलाकार न राहता विषुववृत्तावर थोडासा, पण जाणवण्याइतका फुगलेला आहे. गुरूवर येणाऱ्या प्रचंड वादळांमुळे त्यावर एक लाल डाग दिसतो. गुरू ग्रह हा सर्व ग्रहांमध्ये आकारमानाने आणि द्रव्यमानाने मोठा आहे. त्याचे द्रव्यमान हे सूर्याच्या द्रव्यमानाच्या १००० वा भाग आहे, पण तो इतर सात ग्रहांच्या एकत्र द्रव्यमानाच्या अडीच पट मोठा आहे. गुरू हा पृथ्वीच्या वस्तुमानाच्या ३०० पेक्षाही जास्त पटीने मोठा आहे. त्याचा व्यासही पृथ्वीच्या व्यासाच्या ११ पट मोठा आहे.

गुरूचा स्वतःभोवती फिरण्याचा कालावधी केवळ दहा तास इतकाच आहे. या प्रचंड वेगाने फिरण्यामुळेच त्यावर मोठी वादळे येतात. मात्र, त्याला सूर्याभोवती फिरण्यास जवळजवळ १२ वर्षे लागतात. आणखी एक मजेची गोष्ट अशी आहे की, जेवढी ऊर्जा गुरूला सूर्यापासून मिळते, त्यापेक्षा जास्त ऊर्जा तो उत्सर्जित करतो. गुरू हा एक सर्वाधिक प्रकाशमान ग्रह आहे. गुरूला कमीत कमी ६३ उपग्रह किंवा चंद्र आहेत.

## योग जीवन

मनाली देव

# एकपादउत्कट नमस्कारासन

**मित्र-मैत्रिणींनो, यापूर्वी आपण उत्कटासन, एकपाद उत्कटासन कसे करतात ते बघितले आहे. आज आपण त्याच्याच पुढचा एक प्रकार पाहूया. हा प्रकार थोडासा अवघड आहे. हे आसन एका पायावर तोल संभाळून करायचे आहे.**

### कृती

- एकपाद उत्कटासनामध्ये आपण एक पाऊल दुसऱ्या पायाच्या मांडीवर ठेवतो, पण यामध्ये एका पायाचे पाऊल किंवा घोट्याकडचा भाग हा दुसऱ्या पायाच्या मांडीखाली घ्यायचा आहे.
- त्यानंतर थोडेसे कमरेतून पुढे वाकावे. तोल संभाळला गेला की, ज्या पायावर तोल संभाळला आहे त्या मांडीच्या डाव्या व उजव्या बाजूकडून हात घेऊन छायाचित्रात दाखवल्याप्रमाणे हातांनी नमस्कार करावा.
- ज्या पायावर तोल सांभाळला आहे, त्या पायाची मांडी जमिनीला समांतर ठेवण्याचा प्रयत्न करावा.
- जेवढा वेळ स्थिर राहता येईल, तेवढा वेळ आसन स्थितीमध्ये स्थिर राहावे.
- आसन सोडताना सावकाश सोडावे व दुसऱ्या पायानेसुद्धा करावे.

### लाभ

- या आसनाच्या नियमित सरावाने पायाची, पोटाची व मांडीची ताकद वाढते. एकाग्रता वाढते.




**काळजी :**
उत्कटासन जमू लागल्यावरच या आसनाचा सराव करावा. ज्यांना गुडघ्याचा किंवा लिगामेंटचा त्रास आहे त्यांनी योग्य मार्गदर्शन घ्यावे.

## वाचू आनंदे

# चॅम्पियन व्हा!

दोस्तांनो, शाळेत आपण अभ्यास तर करतोच; पण 'अभ्यासाच्या पलीकडे जाऊन मुलांचा सर्वांगीण विकास व्हायला पाहिजे,' असे मोठी माणसे नेहमी म्हणत असतात. हा सर्वांगीण विकास कसा साधायचा, यासाठीची पंचसूत्रे सांगणारे पुस्तक आहे डॉ. रमा मराठे यांनी लिहिलेले 'चॅम्पियन व्हा!'. या पुस्तकात पाच भाग आहेत- अभ्यास, आरोग्य, आत्मविकास, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी. आपण करतोय त्या कामात यशस्वी होण्यासाठी कसे प्रयत्न करावेत? आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आपल्याला शालेय वयापासूनच कोणते चांगले गुण जोपासावे लागतील? अभ्यास करायच्या चांगल्या पद्धती कोणत्या? शालेय वयापासून आरोग्य कसे जपावे? आणि हे सगळे करतानाच एक चांगला माणूस कसे व्हावे? या प्रश्नांची उत्तरे गोष्टीरूपात देण्याचा प्रयत्न त्यात केलाय. पालकांनी वाचावा असाही एक विभाग या पाच भागांनंतर देण्यात आलाय. साधारण आठवीपासून पुढे अभ्यासातील स्पर्धा वाढत जाते. विद्यार्थ्यांकडून असलेल्या अपेक्षा वाढतात, तसेच त्यांच्यावरील दडपण वाढते. सातवी-आठवी आणि त्यापुढच्या विद्यार्थी व पालकांना या पुस्तकातून काही चांगले मुद्दे नक्की सापडतील आणि त्याचा मुलांना शालेय व त्यापुढच्याही जीवनात फायदा करून घेता येईल.




? ८) गुरूला किती उपग्रह आहेत?

✓ २) भंडारा डोंगरावर संत तुकाराम महाराजांचे मंदिर आहे.

कार्टूनची सफर
अरविंद रेणापूरकर

# बालशास्त्रज्ञ डेक्स्टर!

**'डेक्स्टर्स लॅबोरेटरी' या ॲनिमेटेड शोमधील 'डेक्सर' हे प्रमुख पात्र अतिशय लोकप्रिय आहे. कार्टून नेटवर्कवरील ही मालिका जेनेडी तार्ताकोव्हस्की यांनी साकारली आणि ती १९९६-२००३ या कालावधीत प्रसारित करण्यात आली. या मालिकेला विविध पुरस्कारांसाठी नामांकने मिळाली आहेत. विशेषत: १९९० च्या दशकात लहान मुलांमध्ये त्याची मोठी लोकप्रियता होती.**



## विज्ञानातील हुशारी मोठी

'डेक्स्टर्स लॅबोरेटरी'चे निर्माते तार्ताकोव्हस्की मूळचे रशियाचे असून ॲनिमेटर, दिग्दर्शक आणि पटकथा लेखक म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांना लहानपणापासूनच कलेची आवड होती. ती त्यांनी छान जोपासली आणि 'कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ आर्ट्स'मध्ये व्यंग्यचित्रनिर्मितीचे धडे गिरवले. १९९० मध्ये 'कार्टून नेटवर्क'मध्ये काम करताना त्यांनी 'डेक्स्टर्स लॅबोरेटरी' मालिका तयार केली. अल्पावधीतच ती लोकप्रिय ठरली. डेक्स्टर हा एक लहान, पण अत्यंत बुद्धिमान शास्त्रज्ञ आहे. त्याचे वय केवळ ८ ते १० वर्षे आहे, पण त्याची वैज्ञानिक कौशल्ये प्रगल्भ संशोधकासारखीच आहेत. त्याने आपल्या घरातच एक 'सिक्रेट' प्रयोगशाळा तयार केलेली असते आणि तिथे तो वेगवेगळे वैज्ञानिक प्रयोग आणि संशोधने करत असतो. हुशारी आणि कल्पकता वापरून सतत नवीन शोध लावत असतो.

## शत्रू 'डीडी'!


किरकोळ शरीरयष्टीचा, कमी उंचीचा डेक्स्टर तेजस्वी व्यक्तिमत्वाचा आहे. त्याला मोठा चष्मा आहे. त्याचा चेहरा नेहमी गंभीर असतो. त्याला फ्रेंच भाषेचे ज्ञान आहे आणि तो त्याचा उपयोग काही वेळा 'शायनिंग' मारण्यासाठी करतो. त्याला विज्ञान आणि गणिताची अत्यंत आवड आहे. पण त्याला त्याच्या मोठ्या बहिणीचा 'डीडी'चा फार त्रास वाटतो! ही डीडी केसांच्या दोन शेंड्या बांधणारी, सगळीकडे नाचणारी, गाणारी, अशी स्वच्छंदी मुलगी आहे. पण ती डेक्स्टरच्या कामात नेहमी काही तरी गडबड करून ठेवते. त्यामुळे डेक्स्टर डीडीवर रागावलेला असतो.

## गोष्टी मजेदार


- 'डीडी ॲण्ड द मॅन' या भागाचे कथानक बघा- डेक्स्टरची मोठी बहीण डीडी नेहमीप्रमाणे त्याच्या प्रयोगशाळेत शिरते आणि त्याचे काही प्रयोग बिघडवून ठेवते. त्यामुळे त्रासून डेक्स्टर हा डीडी पुन्हा आपल्या प्रयोगशाळेत कधीही शिरू शकणार नाही अशी एक योजना आखतो. तो एका यंत्राच्या आधारे डीडीच्या व्यक्तिमत्त्वात मोठा बदल घडवतो! तिला अचानक विज्ञान, गणित आणि प्रयोगांमध्ये रस निर्माण होतो आणि ती शिस्तप्रिय होते. ती डेक्स्टरपेक्षाही जास्त हुशार होते आणि त्याच्या प्रयोगशाळेत नवीन शोध लावायला सुरुवात करते. डेक्स्टरकडे दुर्लक्ष करू लागते. मग डेक्स्टरला वाटू लागते, की डीडी पूर्वीच बरी होती! मग ती खोडकर असली तरी चालेल! अखेर तो तिच्या व्यक्तिमत्त्वात केलेला बदल पूर्ववत करतो. डीडी पुन्हा तिच्या नेहमीच्या स्वच्छंदी, धांदरट रूपात येते.
- 'डेक्स्टर्स लॅबोरेटरी'ला व्यंग्यचित्रांच्या दुनियेतली अनेक नामांकने आणि सन्मान मिळाले. १९९७ मध्ये या मालिकेला सर्वोत्तम ॲनिमेटेड शोसाठी नामांकन मिळाले होते आणि २००० मध्ये तिला उत्कृष्ट ॲनिमेशन श्रेणीतील पुरस्कार मिळाला. आणखीही अनेक नामांकने या मालिकेने पटकावली होती.







ज्ञान-विज्ञान
डॉ. तन्मयी रानडे



**मित्र मैत्रिणींनो, तुम्ही डॉक्टरकडे जाऊन औषधे घेता ती गोळ्या किंवा द्रव स्वरूपात असतात. मात्र, याशिवाय एका आधुनिक आणि अधिक परिणामकारक स्वरूपात हल्ली औषधे मिळतात, ते स्वरूप म्हणजे - नॅनो मेडिसिन! 'नॅनो' म्हणजे खूप छोटे हे तुम्हाला माहीत असेलच, तुम्ही नॅनो कारसुद्धा पाहिली असेल. त्यामुळे आज जाणून घेऊया 'नॅनो मेडिसिन'बद्दल...**

# नॅनो मेडिसिन म्हणजे काय?



## नॅनो मेडिसिन म्हणजे काय?

नॅनो मेडिसिन म्हणजे औषधांमध्ये नॅनो तंत्रज्ञानाचा वापर. यात विविध पद्धती वापरून औषधांच्या कणांचा आकार कमी कमी करत 'नॅनो स्केल' म्हणजे १-१०० नॅनोमीटरच्या रेंजमध्ये आणला जातो. नॅनो मेडिसिन विविध स्वरूपात उपलब्ध असतात जसे की

1. **लिपोसोम्स :** या लहान, गोलाकार 'कॅप्सूलेट' असतात.
2. **पॉलिमरिक नॅनोपार्टिकल्स :** हे कृत्रिम पॉलिमरपासून बनवलेले असतात आणि नियंत्रित पद्धतीने औषधे शरीरात पोहोचवण्यासाठी वापरले जाऊ शकतात.
3. **एमआरआयसाठी फ्लोरोसेंट नॅनोपार्टिकल्स :** पारंपरिक कॉन्ट्रास्ट एजंट्सच्या तुलनेत हे नॅनो पार्टिकल्स 'एमआरआय'च्या रिपोर्टची स्पष्टता वाढवू शकतात.

## नॅनो म्हणजे किती लहान?

'नॅनोमीटर' हे परिमाण खूप जास्त लहान असते. तो मीटरचा एक अब्जावा किंवा एक अब्जांश एवढा भाग असतो. आपण काही उदाहरणे घेऊन बघूया म्हणजे, नीट कळेल. उदा. मानवी केसांची रुंदी सुमारे ६०,००० ते १००,००० नॅनोमीटर असते किंवा एका नखाची वाढ दर सेकंदाला सुमारे १ नॅनोमीटरने होते.

- **नॅनो स्केल :** नॅनो स्केल हा शब्द १ ते १०० नॅनोमीटरच्या आकारमानाच्या वस्तूंना सूचित करतो.
- **नॅनो टेक्नॉलॉजी :** नॅनो टेक्नॉलॉजी म्हणजे अशा प्रकारच्या लहान गोष्टींचे विज्ञान आणि अभियांत्रिकी. यात विशेषतः १०० नॅनोमीटरपेक्षा कमी आकाराच्या गोष्टी येतात.

मित्र मैत्रिणींनो, तुम्हाला आवडली का ही माहिती? तुमच्या शिक्षकांच्या मदतीने या 'नॅनो' तंत्राची अधिक माहिती जाणून घ्या आणि आणखी काही उदाहरणे नक्की शोधा.

## फायदे

- शरीराच्या आत थेट रोगग्रस्त ऊतींपर्यंत अचूकरीत्या औषधे पोहोचवणे.
- फक्त रोगग्रस्त ऊतींना लक्ष्य करणे आणि ज्यामुळे बाकीच्या अवयवांचे औषधांच्या दुष्परिणामापासून रक्षण करते.
- विशिष्ट अवयवांना लक्ष्य करून नॅनो मेडिसिन इच्छित परिणाम साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या औषधाचे प्रमाण कमी करू शकते.
- नॅनोकण औषधांचे शोषण आणि अभिसरणाचा वेळ वाढवू शकतात. त्यामुळे उपचारात्मक परिणाम अधिक चांगले होतात.

## तोटे

- नॅनो कणांचे शरीरावर अनपेक्षित विषारी परिणाम होऊ शकतात.
- **दीर्घकालीन परिणाम :** मानवी आरोग्यावर नॅनो पार्टिकल्सचे दीर्घकालीन परिणाम मोठ्या प्रमाणावर होत असून, त्याबाबत अद्याप पुरेशी माहिती नाही.
- **ऊती आणि अवयवांचे नुकसान :** नॅनो कण विशिष्ट अवयवांमध्ये जमा होऊ शकतात. त्यामुळे त्यांच्या कार्यावर परिणाम होऊ शकतो किंवा नुकसान होऊ शकते.
- नॅनो मेडिसिनची किंमत नेहमीच्या औषधांपेक्षा जास्त असते.

## काही उदाहरणे

- **'कोव्हिड' लस :** लिपिड नॅनो पार्टिकल्सचा वापर करून रोगप्रतिकारक पेशींपर्यंत या लशीतील घटक एमआरएनएद्वारे पोहोचवले जातात. त्यामुळे रोगप्रतिकारक शक्तीला फायदा होतो.
- **व्होलिनी :** वेदना कमी करणारे हे जेल तुमच्या घरीसुद्धा असेल. यामध्ये 'डायक्लोफेनाक' नावाचा औषधी घटक नॅनो कणांच्या रूपात असतो. त्यामुळे त्याची वेदनाशामकता वाढते.

? १) 'डेक्स्टर्स लॅबोरेटरी' ही मालिका कोणी साकारली?

✓ ५) गणित













ठिपके जोडून चित्र रंगवा.



मार्ग शोधा.




**पान ५ वरील पेटोपिया सदरातील कोड्यांची उत्तरे-**

१) डॅलमेशियन

२) सायबेरियन हस्की

३) स्फिंक्स मांजर

४) गोल्डन रिट्रिव्हर

५)जर्मन शेफर्ड

हस्त कला


मंदार वैद्य

# जपानची प्रसिद्ध 'सामुराई' टोपी




दोस्तांनो, आजपर्यंत आपण ओरिगामीचे विविध प्राणी-पक्षी करून पाहिले. आज आपण एक वेगळी कलाकृती करून पाहणार आहोत. जपानी युद्धकौशल्यामध्ये निपुण असलेल्या योद्धांना 'सामुराई' असे संबोधतात. सामुराई म्हणजे सुसंस्कृत, शिस्तबद्ध, नियमप्रिय आणि आपल्या निष्ठेसाठी प्रसिद्ध असे हे जपानी योद्धे होते. ही युद्धकला इ. स. १२ व्या शतकात उदयास आली. त्या योद्ध्यांची टोपी म्हणजेच त्यांचे शिरस्त्राण कसे होते? ते आपण पाहूया आणि ओरिगामीच्या माध्यमातून तशी कलाकृती साकार करण्याचा प्रयत्न करूया.

**कृती १**




चौरस कागद तुमच्यासमोर पतंगासारखा धरा. वरील टोक उचलून खालील टोकाला जुळवा व घडी घाला.

**कृती २**




वरील डाव्या व उजव्या बाजूची टोके उचला व खालील टोकाजवळ आणून घडी घाला.

**कृती ३**




आताची दोन टोके तुटक रेषेने दर्शवल्याप्रमाणे घडी घालून वरील टोकाजवळ आणा व घडी घाला.

**कृती ४**




तीच दोन टोके तुटक रेषेने दर्शवल्याप्रमाणे थोडी बाहेरच्या बाजूला आणा व घडी घाला .

**कृती ५**



खालील टोकाजवळ कागदाचे दोन पदर शिल्लक आहेत. त्यापैकी एक पदर तुटकरेषेने दर्शवल्याप्रमाणे वरील बाजूस उचला व घडी घाला .

**कृती ६**




तयार झालेली घडी तुटक रेषेने दर्शविल्याप्रमाणे उचला व वर घ्या, घडी घाला.

**कृती ७**



आता कागदाचा एक पदर खाली शिल्लक आहे. दर्शवलेल्या तुटकरेषेला घडी घालून तो पदर आतमध्ये सरकवा. आतमधला घडीचा बाण मुद्दाम थोडा फिकट केला आहे. ही झाली तुमची 'सामुराई' टोपी तयार!



---

स्पर्धेत उतरताना

जयवंत बोरसे

# शिष्यवृत्ती परीक्षेचे स्वरूप



पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा, शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, तसेच भटक्या विमुक्त जाती व जमातीतील विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा या चारही परीक्षा इयत्ता पाचवीत घेतल्या जातात. परंतु, त्यासाठी वेगवेगळ्या चार परीक्षा न घेता 'पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा' या नावाने एकच शालेय स्पर्धा परीक्षा घेतली जाते.

## पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा

### उद्देश

- ग्रामीण व शहरी प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करणे.
- प्रज्ञावान विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी आर्थिक साह्य करणे/शिष्यवृत्ती देणे.
- त्यांचा आदर्श ठेवून इतर विद्यार्थ्यांना अभ्यासाची गोडी लावणे.

### पात्रता

- विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा म्हणजेच त्याच्या पालकांचे महाराष्ट्रात किमान १५ वर्षे वास्तव्य असावे.
- विद्यार्थी शासनमान्य शासकीय/अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित/स्वंय अर्थसहाय्यित शाळेत ५ वी मध्ये शिकत असावा.
- राज्य बोर्ड (S.S.C.), केंद्रीय बोर्ड (C.B.S.C.) आणि आंतरराष्ट्रीय बोर्ड (I.C.S.C.) यांपैकी कोणत्याही बोर्डाचा अभ्यासक्रम शिकत असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी सदर परीक्षेस बसण्यास पात्र असतो.
- विद्यार्थ्यांचे वय वर्षे विहीत केल्याप्रमाणे असावे.

### शिष्यवृत्ती वाटप

शिष्यवृत्ती परीक्षेतील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पुढील तीन शैक्षणिक वर्षांसाठी (६ वी ते ८ वी) शिष्यवृत्तीची रक्कम प्रदान केली जाते. प्रत्येक शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा होण्यासाठी दरवेळी साइटवरील ऑनलाइन माहिती भरणे आवश्यक असते.

## शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा

### उद्देश

- शासकीय विद्यानिकेतनसाठी प्रवेश परीक्षा घेणे.
- महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करणे.
- आर्थिकदृष्ट्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी, आदिवासी, विमुक्त जाती व भटक्या जमातीतील मुलांना निवासी व दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.

### पात्रता

- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस बसण्यास पात्र असावा.
- विद्यार्थी हा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील रहिवासी असावा.
- विद्यार्थी हा फक्त मुलगा असावा. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या आवेदनपत्रात विद्यानिकेतनसाठी प्रवेशाचा विकल्प लिहून दिलेला असावा.

### शासकीय विद्यानिकेतन

धुळे, औरंगाबाद, अमरावती (शहरी भागात), पुसेगाव (जि. सातारा), केळापूर (जि. यवतमाळ) या पाच ठिकाणी शासकीय विद्यानिकेतने आहेत.

## आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा

### उद्देश

- आदिवासी विद्यानिकेतनसाठी प्रवेश परीक्षा घेणे.
- अनुसूचित जमातीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करुन निवासी व दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देणे.

### पात्रता

- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस बसण्यास पात्र असावा.
- विद्यार्थी हा शासनाने ठरवून दिलेल्या आदिवासी क्षेत्रातील रहिवासी असावा.
- विद्यार्थी हा अनुसूचित जमातीपैकी (S.T.) असावा.
- विद्यार्थी हा फक्त मुलगा असावा.
- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या आवेदनपत्रात विद्यानिकेतनसाठी प्रवेशाचा विकल्प लिहून दिलेला असावा.

### आदिवासी विद्यानिकेतन

पूर्वी फक्त केळापूर, जि. यवतमाळ येथे आदिवासी विद्यानिकेतन होते. परंतु आता सर्व पाचही विद्यानिकेतनमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रवेशासासाठी राखीव जागा ठेवलेल्या आहेत.

## विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा

### उद्देश

- विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा घेणे.
- विमुक्त जाती व भटक्या जमातीतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांची निवड करुन निवासी व दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.


### पात्रता


- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेस बसण्यास पात्र असावा.
- महाराष्ट्र शासन समाजकल्याण खात्यांमार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळेचा शिकत असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी सदर परीक्षेस बसण्यास पात्र असतो.
- विद्यार्थी हा विमुक्त जाती व भटक्या जमातींपैकी (V.J.N.T.) असावा.
- पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेच्या आवेदनपत्रात विद्यानिकेतनसाठी प्रवेशाचा विकल्प लिहून दिलेला असावा.
- विमुक्त जाती व भटक्या जमातीतील विद्यार्थ्यांसाठीचे विद्यानिकेतन कमळापूर (जि. नांदेड) येथे आहे.

(क्रमशः)

• Registered • Date of Publication : शुक्रवार, ११ एप्रिल २०२५ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.









# वैभवशाली वारसा

दोस्तांनो, ताजमहाल, लालकिल्ला, कोणार्क सूर्यमंदिर... ही नावे तुम्ही नक्कीच ऐकली असतील. मात्र, या केवळ ऐतिहासिक वास्तू आहेत असं नाही, तर हा आपला वैभवशाली वारसा आहे. ही वारसास्थळे जोपासणं, त्यांचं संवर्धन करणं हे आपलं कर्तव्य आहे. यासाठी पुरातत्व विभागही प्रयत्नशील आहे. मात्र, नागरिकांमध्ये या वारसास्थळांबाबत जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने जगभरात दर वर्षी 'वर्ल्ड हेरिटेज डे' म्हणजेच जागतिक वारसा दिन १८ एप्रिलला साजरा केला जातो. त्यानिमित्त...

## उद्देश

सांस्कृतिक वारसा आणि विविधता यांबद्दल नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, त्यातून वारसास्थळांचे संरक्षण व संवर्धन व्हावे, यासाठी १८ एप्रिलला 'वर्ल्ड हेरिटेज डे' म्हणजेच जागतिक वारसा दिन. हा दिवस सर्वप्रथम संयुक्त राष्ट्रे शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संस्था म्हणजेच 'युनेस्को'तर्फे साजरा करण्यात आला होता. 'युनेस्को'ने ठरवलेल्या काही वैश्विक मूल्यांच्या आधारे जागतिक वारसास्थळांची यादी तयार करण्यात आली आहे. त्यात कालांतराने भर घातली जाते. सर्वप्रथम ही यादी १९७२ मध्ये तयार करण्यात आली होती. भारताने १४ नोव्हेंबर १९७७ रोजी या मसुद्याचा स्वीकार केला. त्यानंतर भारतातील विविध स्थळांचा या यादीत समावेश करण्यात आला.

## लक्षात ठेवा...

- वारसास्थळे आपल्या वैभवशाली परंपरेची साक्ष देतात आणि आपल्या देशाचा इतिहास सांगतात. त्यामुळे त्यांचा अवमान करू नका.
- कोणत्याही ऐतिहासिक किंवा निसर्गसंपन्न स्थळी गेल्यावर तिथे कचरा करणे, भिंतींवर स्वतःचे नाव लिहिणे, झाड तोडणे असं काहीही करू नका.
- सामाजिक बंधनांचं उल्लंघन होईल असं कोणतंही कृत्य करू नका.
- तुमच्या गावात किंवा परिसरात एखादं ऐतिहासिक स्थळ असेल, तर त्याची निगा राखा. तेथे पर्यटकांसाठी सूचना फलक लावणं, पाण्याची उपलब्धता करणं अशा सोप्या गोष्टी आवर्जून करा.

## हे नक्की वाचा

- सांस्कृतिक वारशात स्मारके, जसे की वास्तुशिल्प, स्मारकशिल्प किंवा शिलालेख, तसेच पुरातन इमारतींचा समावेश होतो.
- नैसर्गिक वैशिष्ट्यांमध्ये भौतिक आणि जैविक रचनांचा समावेश असलेल्या स्थळांचा समावेश होतो. यात भूगर्भीय आणि भौतिक रचना (प्राणी आणि वनस्पतींच्या धोक्यात आलेल्या प्रजातींच्या अधिवासांसह) यांचा समावेश होतो.
- नैसर्गिक स्थळांमध्ये विज्ञान, संरक्षण किंवा नैसर्गिक सौंदर्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या स्थळांचा समावेश केला जातो.






## जगातील महत्त्वाची वारसास्थळे

● चीनची भिंत ● माचू पिचू (पेरू) ● बियालाविजा फॉरेस्ट (पोलंड) ● व्हिक्टोरिया फॉल्स (झिम्बाब्वे) ● स्टेच्यू ऑफ लिबर्टी (अमेरिका)

## भारतातील महत्त्वाची वारसास्थळे

● ताजमहाल ● लालकिल्ला ● कोणार्क सूर्यमंदिर ● खजुराहो ● हंपी ● सुंदरबन राष्ट्रीय उद्यान ● कुतुबमिनार ● जयपूर शहर ● शांतिनिकेतन

## महाराष्ट्रातील महत्त्वाची वारसास्थळे

● अजिंठा लेणी ● वेरूळ लेणी ● एलिफंटा लेणी ● छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-मुंबई ● पश्चिम घाट



**६ वा क्रमांक**

जगातील वारसास्थळांच्या यादीत भारत सहाव्या क्रमांकावर आहे.





### हे कराच...

या सुट्टीत आपल्या राज्यातील, देशभरातील किंवा तुम्हाला शक्य झाल्यास परदेशातील एखाद्या जागतिक वारसास्थळाला भेट द्या. तेथे जाऊन तुम्हाला काय नवीन माहिती मिळाली? अनुभव कसा आला? हे आपल्या मित्रांना सांगा आणि लिहून आपल्या शिक्षकांना, आई-वडिलांना दाखवा.